# Certificate

*This is to certify that the Research paper entitled "देगलूर तालुक्यातील कल्याणीच्या चालुक्यकालीन शिलालेखांचा अभ्यास" submitted by प्रा.डॉ. सुनेवार किशन रामलू has been published in "Excel`s International Journal of Social Science and Humanities (An International Multidisciplinary Journal)" Vol. 1 No.12 October 2019 Issue, ISSN 2277-7539 (Print) Impact Factor (5.631 SJIF) The Research contribution was greatly appreciated and well received by the Review Board Members. The excel publication house would like to express deep sense of gratitude for your esteemed contribution.*

*(Managing Editor)*

*Date: 01-11-2019*

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

ijindex
Digital Directory of Indian Journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

October - 2019
Vol. I No. 12

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE DEGLOOR
Dist. Nanded

**About**
**Excel Publication**

**The Philosophy:**
Excel's International Journal of Humanities and Social Science (EIJHSS) is an open access, peer-reviewed and refereed journal published by Excel Publication House India. The main objective of EIJHSS is to provide an intellectual platform for the international and Indian scholars. EIJHSS aims to promote interdisciplinary studies in humanities and social science.

Submissions should indicate an understanding of the relevant literature and the contribution of the submissions to this body of research. Empirical articles should have an appropriate methodology and be able to relate their findings to the existing literature. Methodological articles must attempt to show how they further existing theory.

The review process: The review process followed by Excel Journal is systematic and thorough. Articles submitted to the journal are initially screened by the editor for relevance and overall quality as judged by the presentation of concepts, methodology and findings. Inappropriate or weak submissions are not forwarded for a formal review. Those considered appropriate are submitted to a double blind review process.

Potential contributors: Every research-oriented individual and institution, and every research student, faculty working anywhere in the world is invited to explore fruitful connections with Excel Publication.

# *Contents*

1) **A Study of Agricultural finance Disbursement by Commercial banks in Maharashtra State**
Mr. Santosh Gaikwad, Dr. Jaishree Suryawanshi 01

2) **A study of Anthology of American Literature**
Dr. Siddiqui Zahed Ali Sadiq Ali 10

3) **An experimental study for improving Emotional Intelligence and Educational outcomes through science subject in std VIII students**
Dr. Naveed-Us-Saher 15

4) **Anthology of English Literature**
Dr. Khan Ansarullah Shafiullah 21

5) **Effect of Urbanization on Education**
Mirza Mahefooz Baig 28

6) **Impact of GST on Electronic Sector in India**
Mr. Bhagwan Sadashiv Patil 34

7) **A Study of Job Satisfaction of Secondary School Teachers of Aurangabad City**
Dr. Mirza Mahefooz Baig 46

8) **Panchayat Raj and People Participation: Empowerment of Women in West Bengal**
Joykrishna Gorai 51

9) **Modern Indian Women Writers in English**
Dr. Pathan P.Y. 69

10) **Postcolonial studies : the key concepts**
Dr. Shaikh Ajaz Perveen 74

11) **Project Finance with predetermined lease for expansion of business**
Prof. Sharda P. Bhudhwant 78

12) **Changing Role of People Management in Digital Era**
Dr. Savita G. Joshi 86

13) **Study the Development of Dairy Cooperative in Ahmednagar District**
Dr. M. A. Raffey, Mr. Adamane Santosh L. 95

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

14) **Recent trends in E-Commerce** 100
Dr. Chopade B.B.

15) **Role of tourism in Eco development** 104
Dr. Madrewar S.G .

16) **Role of ICT in E-Governance and Rural Development in India** 110
Sarika Bhagwanrao Rengunthwar

17) **A Study of Self Concept of X std students of Urdu medium School of Aurangabad City** 114
Dr. Mirza Mahefooz Baig

18) **A Study of Role Commitment of Secondary School Teachers of English Medium School** 118
Dr. Khan Zeenat Muzaffar

19) **Rural Tourism Challenges and Opportunities in Nanded Districts of Maharashtra** 122
Dr. Reshma Dhananjay Doiphode

20) **Critical Analysis of Margery Allingham's Style of Mystery Unraveling** 131
Sayed Irafat Gausoddin

21) **A study of the problem faced by the University students in English Grammar** 136
Mrs. Nusra Mehtab, Mr. Syed Ghayasuddin

22) **Extending Maker Movement into Schools for Re-Designing Education in the 21st Century** 140
Dr. Najmus Saher

23) **A Study of Formation of Derivational Nouns among Dakhni speakers of Hyderabad City** 148
Dr. Najmus Saher

24) **देगलूर तालुक्यातील कल्याणीच्या चालुक्यकालीन शिलालेखांचा अभ्यास** 152
प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू

EXCEL'S INTERNATIONAL JOURNAL OF SOCIAL SCIENCE & HUMANITIES
(An International Multidisciplinary Journal) ISSN 2277-7539 (Print)
Vol. 1 No.12 - October, 2019 Impact Factor 5.631 (SJIF)

# देगलूर तालुक्यातील कल्याणीच्या चालुक्यकालीन शिलालेखांचा अभ्यास

* प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू

देगलूर तालुका हा तेलंगणा आणि कर्नाटकच्या सिमांना जोडणारा आहे. म्हणून नांदेड जिल्ह्यात ह्या तालुक्याला ऐतिहासीक महत्व प्राप्त झाले आहे. आपल्या स्मृती आपल्यानंतरही जीवंत राहाव्या अशी प्रत्येक मानसाची इश्चा असते. व्यक्तीने केलेली सहेतुक आणि अहेतुक अशा सर्व क्रिया मागे राहुन जातात आणि तीचा स्मृतीचिन्हे इतिहासाचे अभ्यासक गोळा करतात. त्याचा पुन्हा अभ्यास करतात. तसाच एक प्रयत्न मीही केलेला आहे. इतिहासकाळातील ती स्मृती चिन्हे म्हणजेच तत्कालीन शिलालेख अभ्यासण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. आणि देगलूर तालुक्यातील शिलालेख असलेल्या गावांना भेटी देवुन त्यातील कांही शिलालेखांचे फोटो घेवून, गावकऱ्यांच्या मुलाखती घेवून कांहीशी माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला आहे.

देगलूर तालुक्यातील होट्टल, करडखेड, तडखेल, खानापूर, नरंगल, देवापूर, येरगी, बेंबरा इत्यादी गावांना जाऊन तेथील शिलालेखांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यासाअंती असे स्पष्ट झाले की, त्या त्या गावांतील सर्वच शिलालेख कल्याणीच्या चालुक्यकालीन आहेत. देगलूर तालुक्यात जवळपास २३ शिलालेख सापडले आहेत. त्यापैकी बरेच शिलालेख १९६२-६३ च्या काळात पुरातत्व खात्याने संकलीत करुन नेले. याशिवाय मंदिरामध्ये असलेले शिलालेख, मंदीराच्या समोर असलेले शिलालेख, कांहीच्या शेतात असलेले शिलालेख लोकभावनेस्तव आजुनही तेथेच आहेत. त्या शिलालेखातील वर्णनांची माहिती कांही ग्रंथांच्या आधारे, कांही तंज्ञाच्या लेखातून, कांही गावकऱ्यांच्या मुलाखतीतून संकलीत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या शिलालेखांची माहिती पुढीलप्रमाणे.

* इतिहास विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded



**अ) तडखेल (तडखल्लू) येथील शिलालेख :-**

सद्याच्या देगलूर तालुक्यातील तडखेल येथे एकुण थेन शिलालेख सापडले आहेत. त्या शिलालेखातील माहिती पुढील प्रमाणे आहे.

**१. पहिला शिलालेख :**

हा शिलालेख इ.स. १०४७ सालाचा आहे. देगलूर परिसरातील हा सर्वात प्राचीन शिलालेख आहे. या शिलालेखात कल्याणीचा चालुक्य घराण्यातील राजा सोमेश्वर पहिला (इ.स. १०४३-१०६८) पर्यंतची वंशावळ दिलेली आहे. राजा सोमेश्वर - I ने सेऊण देश, कोंकण, माळवा, चोला, इत्यादी राज्यांना आपल्या सेनाधिकाऱ्याच्या माध्यमातून पराभव करून जिंकून घेतल्याचाही उल्लेख आहे. या शिलालेखात सोमेश्वर - I च्या नागवर्म या सेनाधिकाऱ्याचा उल्लेख बराछ स्पष्ट करण्यात आला आहे. या शिलालेखातून स्पष्ट होते की, नागवर्म हा वाजी कुळाचा होता. तो सोमेश्वर पहिलाचा सेनापती होता. नागवर्मने माळवाचा राजा परमारभोजवर आक्रमण केले ते आक्रमण एवढे तीव्र होते की, परमारभोजला आपली राजधानी धार सोडून पळून जावे लागले. आणि नागवर्म ने माळवा जिंकून घेतला. नागवर्मची ही माळवा मोहीम इ. स. १०४७ मधील असावी.

याचा शिलालेखात सोमेश्वर राजाने कोकणच्या एका मुख्य अधिकाऱ्यांचा पराभव केला असा उल्लेख आहे. पण तो अधिकारी निश्चित कोण असावा हे निश्चित सांगता येत नाही. शिलालेखातच नागवर्मला 'मारसिंग मर्थन' अशा उपाधीने गौरविलेले आहे. त्यावरुन असे म्हणता येते की, कोकणाचा तो मुख्य अधिकारी मारसिंग असावा. नागवर्म ने त्याचा पराभव केला असावा. ही कोकण मोहिम नागवर्मच्या नेतृत्वाखाली केली गेली असावी. तसेच नागवर्मने विद्यराजा मल्ल (विद्याधिपती) या राजाचा व सेऊण देशाचा राजा भिल्लम याचाही पराभव केला होता. असे वर्णन या शिलालेखात आहे.

अशा प्रकारे नागवर्मने माळवा, कोकण, विंद्य, सेऊण देश जिंकून सोमेश्वरच्या साम्राज्यास जोडले राजा सोमेश्वरही खुश झाला आणि त्याने नागवर्मला आपल्या संपूर्ण सेनेचे सेनापती पद देवून गौरविले. त्याप्रसंगी सोमेश्वरने षोडस् महादान दिल्याचाही उल्लेख आहे. त्याप्रसंगी सोमेश्वर - I ने नागवर्मचा विवाह ही लाऊन दिला आणि विवाहात सोमेश्वर - I हा राजा स्वत : उपस्थित होता. आणि नागवर्मला सक्करगे - ८० या विभागातील तडखल्लू (तडखेल) हे गाव दान म्हणून दिले. नागवर्मने नंतरच्या काळात तडखेल (तडखल्लू) परिसरात व अनेक भोवतालच्या गावात फार मोठया प्रमाणात देवालयांची निर्मिती केली. आणि त्या देवालयांना जमिनीचे

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



पट्टे दान म्हणून दिले. तसेच मंदिरांच्या दिवाबत्ती व व्यवस्थेसाठी व्यापारी कराचा कांही हिस्सा ही निर्धारित करुन दान म्हणून दिला. या सर्व मंदिरांवर देखरेख करण्यासाठी म्हणून 'कालमुख संपद्रायाचा' वाघेश्वर पंडित यास व्यवस्थापक म्हणून नियुक्त केले. आणि जवळपास ५२ ब्राह्मणास घरे बांधण्यासाठी जागा दान म्हणून दिल्याचाही उल्लेख आहे. म्हणजे यावरुन स्पष्ट होते की, नागवर्मने तडखेल (तडखल्लू) परिसरात ५२ मंदिराचे निर्माण केले असावे. तसेच भोगीशेट्टी नावाच्या एका व्यापाऱ्याने या परिसरातील मंदिरांना आणि त्या ब्राह्मण कुटूंबाना आपल्या उत्पन्नाचा काही भाग दान म्हणून दिला होता. असाही उल्लेख पहिल्या शिलालेखात आहे.

**२. दुसरा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. १०७० सालचा आहे. यावेळी कल्याणीचा राजा सोमेश्वर -II (इ.स.१०६८-१०७६) हा होता. याचा शिलालेखात सोमेश्वर -II च्या कारकिर्दीतील कर्करस नावाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. सोमेश्वर - II ने स्वतःस 'अमरावती पुरवरेश्वर' हे बिरुद लाऊन घेतल्याचाही उल्लेख आहे. याचा शिलालेखात करडीकल्लू (करडखेड) येथील दंडनायक कालीमय्या याने 'निगलम कमला जीनलाय' हे देवालय बांधले आणि त्या देवालयास देईगावे (देगांव) व तडखल्लू (तडखेल) या गावांची जमीन त्या परिसरातील लोकांच्या आणि नागवर्म याच्या परवानगीने दान म्हणून दिल्याचा उल्लेखही आहे. यात उल्लेख केलेला नागवर्म्य हा नागवर्मच असावा. यात विशेष म्हणजे दान म्हणून दिलेल्या जमिनीचा कांही भाग जैन धर्मीय साधूंवर खर्चा करण्यात यावा असाही उल्लेख आहे. यावरुन स्पष्ट होते की, सोमेश्वर - II हा राजा धर्मसहिष्णू होता. आपल्या ह्या परिसरात त्यावेळी जैन धर्मांचा प्रभावही निश्चितच असावा हे स्पष्ट होते. कारण तडखेल येथील मंदिराच्या पाठीमागे एक स्तंभलेख आजही आहे. त्यावर थेन बाजूने लेख आहेत व एका बाजूवर भगवान महाविराची उभी प्रतिमा कोरलेली आहे.

**क) खानापूर येथील शिलालेख :-**

खानापूर येथे आढळलेला शिलालेख इ.स.च्या अकराव्या शतकातील आहे. या शिलालेखात सोमेश्वर पहिला याचा उल्लेख 'त्रिलोकमल्ल' असा करण्यात आला आणि येथे सोमेश्वर प्रथम हा राजा राज्य करीत होता असा उल्लेख आहे. या शिलालेखातील वर्णनावरुन स्पष्ट होते की, सध्याच्या देगलूर परिसरावर कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर पहिला याचे वर्चस्व होते. याचा शिलालेखात दंडनायक कालिथस याच्या संबंधीचेही उल्लेख आहेत. पण सविस्तर माहिती आढळत नाही.

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



**ड) नरंगल (नेरिलगे) येथील शिलालेख :-**

चालुक्य कालीन नेरिलगे म्हणजे सध्याचे देगलूर तालुक्यातील नरंगल होय. येथे इ.स. च्या १२ व्या शतकातील शिलालेख सापडला आहे. या शिलालेखात चालुक्य राजा विक्रमादित्य - VI (इ.स. १०७६-११२६) च्या एका अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. त्याने इ.स. १०८३ मध्ये वेंगीवर आक्रमण करुन वेंगी प्रदेश कल्याणीच्या चालुक्य साम्राज्यास जोडला होता. आणि स्वतःस 'अमरावती पूर्वराधीश्वर' अशी उपाधी स्वतःच्या नावासमोर धारण केली होती. असा उल्लेख शिलालेखात आहे. तो अधिकारी अनंतपाल हाछा होता. वेंगी विजय अनंतपालने मिळवून दिल्यामुळे राजा विक्रमादित्य - VI याने त्यास नेरिलगे (नरंगल) चा परिसर जहागीर म्हणून किंवा बक्षीस म्हणून दिला. आणि पुढीलकाळात नेरिलगे (नरंगल) हा परिसर त्याची कर्मभूमी बनली असावी. त्या अनंतपालचे उत्तराधिकारी नरंगल मधेच राहिले असावे. कारण आजही नरंगलमध्ये एक पालघराणे आहे. याचा घराण्याचा पूर्वंज पराक्रमी, शुर, वीर, असलेला अनंतपाल असावा.

**इ) देवापूर येथील शिलालेख :-**

होट्टलपासुन जवळच देवापूर हे गांव आहे तेथे इ.स. च्या १२ व्या शतकातील एक शिलालेख सापडला आहे. हा शिलालेख अपूर्ण आहे. यामध्ये उल्लेख आहे की, बेनमय्या किंवा बेनमय्यारसाने बांधलेल्या केशवदेव देवालयास जमीन दान म्हणून दिली होती. हा शिलालेख अपूर्ण असल्याने अल्पशीछा माहिती त्यावर कोरलेली आहे.

**ई) येरगी येथील शिलालेख :-**

**१. पहिला शिलालेख :-**

होट्टल पासुन जवळच येरगी हे गांव आहे. या ठिकाणी एकंदरीत पाछा शिलालेख सापडले आहेत. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे आहे. येरगी येथील पहिला शिलालेख इ.स. १०७८ सालचा आहे. हा शिलालेख चालुक्य राजा विक्रमादित्य - VI याच्या काळातील असावा. यात माणिक भंडारी व दंडनायक चटपय्या यांनी 'अग्रहार येरगी' येथील मुलस्थानच्या देवालयास जमीन दान म्हणुन दिल्याचा उल्लेख आहे. कांही व्यापाऱ्यांच्या श्रेणीने देखील 'अग्रहार' येरगीस नगथी स्वरुपात आर्थिक मध्त केली होती याचाही उल्लेख आहे.

**२. दुसरा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. ११३४ सालचा आहे. हा शिलालेख सोमेश्वर - II च्या काळातील आहे. यामध्ये 'अग्रहार येरगी' येथील शैक्षणिक संस्थेचे संचालक मंडळ (घाटे) आणि इतर प्रतिष्ठित मंडळींनी केशवदेव या देवालयास

DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

काही दान देण्याचा निर्णय घेतला होता असा उल्लेख आहे. हा शिलालेख कन्नड भाषेत आहे. सोमेश्वर - III च्या काळात येरगी स्थानाचा बराच विकास झाला. त्यांच्याचा काळात तेथे मंदिर व घटिकास्थानाची निर्मिती झाली. येथील बारवसुध्दा याचा काळात निर्माण झाले.

### ३. तिसरा शिलालेख

हा शिलालेख इ.स. ११३८ सालचा आहे. यामध्ये 'महामंडलेश्वर इरशेमरस' यांनी उक्कलगावं या ठिकाणची काही जमीन आणि घरं बांधण्यासाठी उपयुक्त अशी जागा केशवदेवाच्या देवालयास दान म्हणून दिल्याचा उल्लेख आहे. केशवदेव देवालयाच्या व्यवस्थेसाठी कराच्या उत्पन्नातूनही कांही हिसा दान म्हणून दिला होता असाही उल्लेख आहे. कांही व्यापारी मंडळीनीही केशवदेव देवालयच्या व्यवस्थेसाठी हातभार लावल्याचाही उल्लेख आहे.

### ४. चौथा शिलालेख :-

हा शिलालेख इ.स. ११४९ सालचा आहे. हा शिलालेख 'जगदेकमल्ल' - II (इ.स. ११३५-११५७) च्या काळातील आहे. 'महामंडलेश्वर इरशेमरस' याने येरगी येथील मुलस्थानच्या देवालयास काही जमीन दान म्हणून दिली होती असा उल्लेख आहे.

### ५. पाचवा शिलालेख :-

हा शिलालेख १२ व्या शतकातील आहे. यामध्ये महामंडलेश्वर अपराधित्यदेव याचा उल्लेख करण्यात आला आहे. हा शिलालेख चांगल्या स्थितीत नसल्यामुळे त्यामधील बरीच माहिती उपलब्ध नाही.

### उ) बेंबरा (विम्रा) येथील शिलालेख : -

हा शिलालेख सुध्द कन्नड भाषेत आहे. हा शिलालेख इ.स. ११२२ सालचा आहे. त्यावेळी कल्याणीच्या चालुक्याच्या राजपथवर विक्रमादित्य - VI हा होता. हा शिलालेख थेन्ही बाजुने कोरवलेला आहे. यामध्ये कल्याणीचा चालुक्य घराण्यातील ब्रह्मा पासून ते त्रिभुवनमल्ल विक्रमादित्य - VI या राजापर्यंतच्या वंशावळीची माहिती देण्यात आली आहे. विक्रमादित्य - VI ची पत्नी राणी मल्लाणी देवी संबंधीही माहिती देण्यात आली आहे. मल्लाणी देवी व त्याचाबरोबर तिच्या काळातील अधिकारी नागराज, वाजी व वाजी कुळातील उत्तराधिकाऱ्यांची माहितीही या शिलालेखात आहे. विक्रमादित्य - VI ची राणी सगलदेवीने विनंती केल्यावरुन

रेवणेश्वराच्या (देवनेश्वर) देवालयास जमीन दान म्हणुन देण्यात आली होती. याचीही नोंद या शिलालेखात करण्यात आली आहे. कालीचोरची पत्नी रेब्बलदेवीच्या सुचनेवरुन महामंडलेश्वर इरशेमरसाने 'नागरहाळू' (नागराळ) हे गाव रेवणेश्वर (देवनेश्वर) या देवालयास दान दिल्याची नोंदही यामध्ये आहे. विम्रा येथील शिलालेखावरुन स्पष्ट होते की, चालुक्य घराण्याला कार्तिकेयाचे वरदान होते. चालुक्य घराणे दुर्गा देवतेची पूजा करीत असल्याचेही म्हटले आहे. तसेच बदामी येथील चालुक्यांचा पाडाव कोणत्या काळात झाला. याचाही उल्लेख त्यामध्ये करण्यात आला आहे.

**ऊ) करडखेड (करडखल्लू) येथील शिलालेख :-**

देगलूर जवळच करडखेड येथे एकंदरीत नऊ शिलालेख सापडले आहेत. त्यांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**१. पहिला शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. १०७९ सालचा आहे. यामध्ये करडीकल्लू (करडखेड) येथील महामंडलेश्वर कर्करसाने सोमनाथ मंदिर, (सोमेश्वर मंदीर) धोरेश्वर मंदिर, कालीचोरेश्वर मंदिर, प्रसन्नभैरव मंदिर इत्यादी देवालयांना जमिनी दान दिल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. कर्करसानेछा या मंदिरांची निर्मितीही केली असावी. महामंडलेश्वर कर्करसाने अवरवाडी - ७०० या विभागातील आलुरु व सक्करगे - ६०० या विभागातील कावालगावे (कावळगांव) ही खेडीसुध्दा करडीकल्लुच्या वरील देवालयांना दान म्हणून दिल्याचे उल्लेख आहेत. (अवरवाडी - ७०० व सक्करगे - ६०० हे तत्कालीन शासन व्यवस्थेचे विभाग होते.) करडीकल्लू येथील मंदिरांना ज्या काही जमिनी दान म्हणून दिल्या होत्या किंवा गावे दान दिली होती. त्या सर्व जमिनींचा व गावाचा जो काही कारभार होता त्या सर्व कामावर देखरेख ठेवण्यासाठी म्हणुन चंद्रशेखर पंडित याची नियुक्ती करण्यात आली होती. असाही उल्लेख करण्यात आला आहे.

**२. दुसरा शिलालेख :-**

हा शिलालेख १०८८ सालचा आहे. यामध्ये वहनी घराण्यातील (अग्निकुल) कालीचोररसा बद्दलची माहिती दिलेली आहे. त्याने स्वतःच बांधवलेल्या देवालयाच्या कळसाचे काम पूर्ण केले असा उल्लेख आहे. ते देवालय नेमके कुठले होते या विषयी स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नाही. कालीचोरसाने त्या देवालयास 'गवूमदगावे' (गवंडगाव) हे गावही दान दिल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

**३. तिसरा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. ११०२ सालचा आहे. यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, महामंडलेश्वर सामंत ठाकूर याने नेरीलगे (नरंगल) हे गाव करडखेड येथील स्वयंभू सोमेश्वरदेव या मंदिरास दान म्हणून दिलेले होते.

**४. चौथा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स.११३३ सालचा आहे. यामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, अलूस (आलूर) हे गाव महामंडलेश्वर मदनकर्णरसाने करडीकल्लू (करडखेड) येथील सोमेश्वर देवालयास/मंदिरास दान म्हणून दिले आहे.

**५. पाचवा शिलालेख :-**

करडखेड येथील हा पाचवा शिलालेख थेन्ही बाजूनी कोरलेला आहे. या शिलालेखात कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील राजा तैल - II ते विक्रमादित्य - VI पर्यंतची वंशावळ देण्यात आलेली आहे. तसेच वहणी कुळाची उत्पत्ती कशी झाली व त्या कुळात कोणकोणते महत्त्वाचे सरदार होऊन गेले. त्या संबंधीची माहिती नमुद करण्यात आलेली आहे. वहणी घराण्यातीलछा कर्क याने करडीकल्लू येथे सोमेश्वर या देवालयाची स्थापना केली असावी असा उल्लेख आहे. याचा पाचव्या शिलालेखात दुसऱ्या बाजूस वहनी कुळातील कालीचोर व त्याची पत्नी रेब्बलदेवी यांचाही उल्लेख आहे. कथचित हा शिलालेख विक्रमादित्य- VI च्या काळातील असावा असे तज्ञाचे मत आहे.

**६. सहावा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. ११८० सालचा असावा. हा शिलालेख भूलोकमल्ल सोमेश्वर - III च्या काळातील आहे. यामध्ये उल्लेख आहे की करडखेड येथील स्वयंभू सोमनाथच्या देवालयास 'महामंडलेश्वर इरशेमरस' याने धुकावे, (घुळा) हिप्पलगावे (हिप्परगा) आणि बोरीगावे (बोरगांव) ही खेडी दान म्हणून दिल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**७. सातवा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. ११८० सालातील असावा. कल्याणीचा चालुक्य राजा भूलोकमल्लदेव म्हणजे सोमेश्वर -

Arts, Science & Commerce College Naigaon Dist. Nanded



III च्या काळातील असावा. सोमेश्वर - III चा सामंत महामंडलेश्वर (आयुक्त) इरशेमरस हा इराऊइरछ्छमीरा (१००० खेडयांचा समूह असलेला एक भुभाग) यावर अंमल करीत होता. या शिलालेखात उल्लेख आहे की, अनसहेनी हेमाथीयरस अवराडी याने अवराडी - ७०० या विभागातील अलूर, गऊडगावे, कावालगावे, द्यासवलीगे, धुकावे, बोरीगावे, नेरीलगे आणि हिप्पलगावे इत्यादी तसेच सक्करगे - ६०० या विभागातील गावांच्या उद्योगधंद्यांवरील करांपासून मिळणारा काही भाग करडखेड येथील सोमनाथाच्या मंदिरास व्यवस्थेसाठी दान म्हणून दिला होता. असा उल्लेख आहे.

**८. आठवा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. ११३३ सालचा आहे. कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर - III च्या काळातील हा शिलालेख आहे. यामध्ये उल्लेख आहे की, सोमेश्वर - III हा उत्तरेकडील माहिमेवर जात असतांना या आपल्या भागात तळ ठोकून कांही दिवस मुक्कामास होता असा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच दंडनायक (सेनाधिकारी) श्रीधरराव याने सक्करगे ८० या विभागातील त्यांच्या अमलाखाली असलेल्या भइंगव्हे (भायेगांव) या गावांपासून त्याला मिळणाऱ्या जमिनीच्या उत्पनाचा काही भाग दान म्हणून करडीकल्लुच्या (करडखेड) सोमनाथ मंदिरास दिला होता असा उल्लेख आहे.

**९. नववा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. ११४८ सालचा आहे. यामध्ये महाप्रधान मानव रगडे (कर वसुली अधिकारी) याने काही जमीन देवालयांना दान दिल्याचा उल्लेख आहे. पण ती नेमकी कुठली ती कुण्या देवालयास दान दिली होती. याचा मात्र स्पष्ट उल्लेख करण्यात आला नाही.

**होट्टल येथील शिलालेख :-**

होट्टल हे देगलूर पासून पाछा मैल अंतरावर असलेले एक चेटेसे गाव आहे. या गावाच्या पूर्वेकडे एक भग्नावस्थेत असलेले मंदिर आहे. त्याला नंथीमंदीर असे म्हणतात. मंदिराजवळ एक शिलालेख आहे. त्या मंदिरामध्ये गर्भगृहात सध्या कोणतीही मूर्ती नाही. त्या मंदिराच्या बाह्य बाजूला शिल्पकलेचे अप्रतिम उत्कृष्ट व आकर्षक अशी शिल्पांची निर्मिती केलेली आहे. हा शिलालेख मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस आहे. हा शिलालेख एक पाषाणी आयाताकृती स्तंभावर कोरलेला आहे. त्याची उंची ०५ फुट ०८ इंछा आहे. रूंधी ०१ फुट ०५ इंच आहे तर जाडी ०१ फुट ०.७५ इंछा आहे. हा शिलालेख स्तंभाच्या दोन्ही बाजूने कोरलेला आहे. हा शिलालेख

ADAT... Dist.Nanded





अनेक वर्ष उघड्यावरच असल्या कारणाने ऊन पाऊस व वातावरणातील रासायनिक द्रव्यामुळे शिलालेखाच्या पुढच्या अंगावरील बरीच्छ अक्षरे अस्पष्ट व भंगलेली दिसतात. शिलालेखाच्या मध्यभागातील तीन ठिकाणची अक्षरे तर अजिबातच्छ ओळखता येत नाहीत. त्यामानाने शिलालेखाच्या मागील बाजूची अक्षरे सुरक्षित व चांगली आहेत. हा शिलालेख देवनागरी लिपी व संस्कृत भाषेतील आहे. तज्ञांच्या मते हा शिलालेख इ.स. च्या ११ व्या किंवा १२ व्या शतकातील असावा. या शिलालेखात एकुण १२५ ओळी आहेत. या शिलालेखाच्या लेखकाचे नाव लक्ष्मन असल्याचा उल्लेखही त्यावर आहे. हा शिलालेख स्थानिक अधिकाऱ्याने कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी कृतिका नक्षत्रावर किंवा त्या दिवशी कोरण्याचे काम सुरू केले. असा उल्लेख याचा शिलालेखातील ३७ व्या श्लोकात केला आहे. या शिलालेखात तिथी, मास, नक्षत्र व वेळ यांचा उल्लेख केलेला आहे. पण दुर्दैवाने शतकाचा उल्लेख कुठेही केलेला नाही. म्हणून या शिलालेखाचा निश्चित कालखंड सांगता येत नाही. या शिलालेखाच्या पहिल्या बाजुवर प्रारंभी सूर्य, चंद्रकोर, पाय दुमडलेला नंदी, सवत्स धेनु, शिवलिंग यांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. या वरून स्पष्ट आहे की, हा शिलालेख शैव संप्रदायाचा आहे. शिलालेखाच्या प्रारंभी शिवस्तुती कोरलेली आहे. यातील शिवस्तुती व शेवटची ओळ सोडल्यास संपूर्ण शिलालेख पद्य रूपातच आहे.

या शिलालेखाच्या पद्यात विविध वृतांचा समावेश आहे. त्यात १,२,४,१२,१३,१५ ते १८,२१,२४,२६,२७,३०, ३१,३५ ते ४० व ४३ हे श्लोक शार्दुल विक्रीडीत वृतात आहेत.

तर ३,७,८,१९ व २५ हे श्लोक स्त्रग्धरा वृतात आहेत.

६ व १४ हे श्लोक मंथक्रांता वृतात आहेत.

९ वा श्लोक स्वागत वृतात गुंफलेला आहे.

२० व २९ हे श्लोक उपजाती वृतात आहत.

१२,२३ व ४२ हे श्लोक इंद्रवज्रा वृतात आहेत.

३३, ३४ व ४१ हे श्लोक अनुष्टुप छंदात आहेत.

या शिलालेखात एकुण ४३ श्लोक कोरलेले आहेत. त्यांचा अनुक्रमही एका पाठोपाठ दिलेला आहे. शिलालेखात कांही ठिकाणी अनुस्वार व शब्दसंधी चुकीचे असल्याचे इतिहासकार डी.सी.सरकार व जी.भट्टाचार्य यांनी नमूद केले आहे. शिलालेखाची दुसरी बाजू याचा प्रारंभ ओम नमः शिवाय ने केलेला आहे. त्यानंतर शिवस्तुती, शिववंदना येते. त्यानंतर कैलास पर्वताचे वर्णन व अगस्ती ऋषीच्या आश्रमाचे व अगस्ती ऋषींच्या तपश्चार्येचे रसाळ वर्णन येते. अगस्ती ऋषीच्या कामधेनूचे अपहरण कसे झाले याचेही वर्णन येते.

DEGLOOR COLLEGE DEGLOOR



त्यानंतर अग्निकुल (अग्निज्ञाती) च्या आदीपुरुषाचा जन्म व त्याने दानवाचे केलेले निर्धलन याची कथा येते. अग्रिकुलातील धोर / ध्रुव ची माहिती आल्यानंतर परमार घराण्यातील वाक्पती मुंजा व पश्चिाम चालुक्य घराण्यातील लैला या सम्राटांचीही माहिती आहे त्यावरुन अग्नीकुळातील ध्रुव-मुंजा आणि लैला हे समकालीन आहेत हे स्पष्ट होते. परमार व चालुक्य घराणे यांच्यात बराछा काळपर्यंत संघर्ष चालू होता. पण त्यात ध्रुव ची भूमिका काय होती. याची निश्चित कल्पना येत नाही. त्यानंतर अग्नीज्ञाती कुळातील उत्तमा व उत्तमाचा पुत्र कालीचोर - I त्याचा पुत्र अगंदेव व अगंदेवाने गाजविलेला पराक्रम या विषयीचे वर्णन येते. त्यानंतर २०,००० गावांवर कारभार करणारा कालीचोर - II ची माहिती मिळते. त्यानंतर कालीचोर - II चा स्नेही पेशासिधुगी याच्या विषयीची माहिती मिळते. सिधुगीची या शिलालेखात बरीछा प्रशंसा केलेली आढळते. सिधुगीची कर्ण, नागार्जुन, विक्रमादित्य, सीबी आणि वैरोछानी यांच्या बरोबर तुलना केलेली आढळते.

सिधुगीने राजा सोमेश्वरची राजधानी कल्याणी येथे एका शिवलिंगाची प्रतिष्ठापना केल्याचा उल्लेख मिळतो. तेछा कल्याणीतील सिध्देश्वर नावाचे शिवमंदिर होय. आणि त्या शिवलिंगाच्या आराधनेसाठी किंवा मंदिरव्यवस्थेसाठी त्याने प्रत्येक गावातून एक निष्क व एक थम देणगी म्हणून दिल्याचाही उल्लेख आढळतो. होट्टल च्या सिध्देश्वर देवालयाच्या व्यवस्थेसाठी अशाछा प्रकारची आर्थिक व्यवस्था विषयपती येरगा याने केल्याचाही उल्लेख मिळतो. पुढे रायभेया याचाही उल्लेख मिळतो. तज्ञांच्या मते रायभेया, कालीचोर - II आणि निंगळकमला ही एकाच व्यक्तीची नावे असावीत या शिलालेखातछा गुरुमठ, रेभेश्वर मंदिराचे उल्लेखही आलेले आहेत.

या शिलालेखात कसलाच तिथी निर्देश करण्यात आलेला नाही. शिलालेखात कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर असाच उल्लेख येतो. पण कल्याणीच्या चालुक्य घराण्यात सोमेश्वर नावाचे चार राजे होऊन गेले. त्यात सोमेश्वर - I (इ.स. १०४३-१०६८), सोमेश्वर - II (इ.स.१०६८-१०७६) सोमेश्वर -III, सोमेश्वर -IV (इ.स.११९० पर्यंत) यापैकी सोमेश्वर - I किंवा सोमेश्वर - II यांचाच उल्लेख या शिलालेखात आला असावा. असा तज्ञांचा अंदाज आहे. या शिलालेखावरुन स्पष्ट होते की, इ.स.च्या अकराव्या शतकात देगलूर परिसरावर प्रत्यक्ष अग्निकुलांचे अंमल होते. हे स्पष्ट होते.

170

**१) होट्टल येथील पहिला शिलालेख : -**

हा शिलालेख इ.स. ११०१ चा आहे. हा शिलालेख दोन्हीबाजूने कोरलेला आहे या शिलालेखाची दुसरी बाजु स्पष्ट आहे. संक्रमनप्रसंगी त्रीपुरुषदेवास रेब्बयनायक व त्याच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या दानाची नोंद या शिलालेखात आहे.

**२) होट्टल येथील दुसरा शिलालेख :-**

हा शिलालेख इ.स. ११२० सालचा आहे. यात उल्लेख आहे की, कालेय नायकाच्या आज्ञेवरुन वीररसाने पोट्टला होट्टल व मदनूरु येथील उत्पनाचा कांही भाग स्वयंभू रेब्बसवर देवास किंवा मंदिरास व्यवस्थापनासाठी दान म्हणून दिल्याचे म्हटले आहे.

**३) होट्टल येथील तिसरा शिलालेख :-**

वरील दोन शिलालेखापेक्षा कांहीसा आधीचा हा शिलालेख आहे. हा शिलालेख अकराव्या शतकातील आहे. हा शिलालेख देवनागरी लिपीत, संस्कृत भाषेत आणि पद्यरुपात आहे हा शिलालेख नेमका कुण्या काळातील आहे याचा स्पष्ट उल्लेख नाही. पण शिलालेखातील वर्णनावरुन सोमेश्वर - II (इ.स.१०६८-७०) च्या काळातील तो असावा असे वाटते. या शिलालेखाद्वारे वहनी किंवा पावक घराण्याची माहिती प्रथमतःच उपलब्ध झाली आहे. या घराण्याचा मूळ पुरुष 'मानसिध्दी' हा होता. चालुक्य घराण्यातील राजा तैल-II (इ.स.११५७-११६३) आणि परमार राजा मुंजा यांच्यात झालेल्या लढाईत वहनी घराण्यातील राजा धोर याने भाग घेतला होता. असा उल्लेख आढळतो पण ती लढाई कुठे व केंव्हा झाली याचा कसलाच उल्लेख या शिलालेखात नाही. वहनी घराण्याचे चालूक्यांच्या सिदधुगी नावाच्या अधिकाऱ्याशी चांगले संबंध होते, मित्रत्वाचे संबंध होते. सिदधुगीनेच चालुक्यांची राजधानी कल्याणी येथे सिध्देश्वर नावाचे शिवमंदिर बांधवले होते. अशी नोंद या शिलालेखात आहे.

अशाप्रकारे देगलूर तालुक्यात आढळलेले सर्वच शिलालेख कल्याणीच्या चालुक्य कालीन आहेत. तत्पुर्वीचा कोणताछ ऐतिहासीक पुरावा अद्यापपर्यंत तरी सापडला नाही. उपरोक्त शिलालेखांवरुन कल्याणीच्या चालूक्य घराण्यातील राजा सोमेश्वर I ते जगदेकमल्ल III पर्यंतचा इतिहास कळतो. (इ.स.१०४७-११८०) त्या परिसरावर चालूक्यांचे वर्चस्व होते. देगलूर तालूक्यातील येरगी हे तत्कालीन प्रसिध्द अग्रहार होते हे स्पष्ट होते. या परिसरात चालूक्यांचे कर्तृत्ववान मांडलीक घराणे होते. त्यांनी चालूक्यांसाठी अनेक विजय मिळवून दिल्याचेही

स्पष्ट होते. त्याचाबरोबर चालूक्य घराणे हे धर्मसहिष्णूही होते. कारण तडखेल भागात अनेक जैन धर्मीय प्रतिमा आणि जैनांचे शिलालेखही सापडले. जैनमंदिरांना जमिनीचे पट्टे दान दिल्याचेही उल्लेख सापडतात. शैव संप्रथय आणि जैन धर्मीय यांची ह्या भागात अनेक मंदिरे असल्याचेही स्पष्ट होते. म्हणून देगलूर तालुक्याला फार मोठा सांस्कृतीक वारसा लाभलेला आहे हेही स्पष्ट होते.

संदर्भ ग्रंथ सुची :


१) ठोसर, हरिहर - हिस्टॉरिकल जॉग्रफि ऑफ महाराष्ट्र अॅन्ड गोवा पृ. ५११

२) पाठक अ.शं. - महाराष्ट्रातील बारव स्थापत्य - पृ. ४४

३) प्रभाकर देव - हेरिटेज नांदेड -

४) नांदेड जिल्हा गॅझेटियर, पृ. ५६३

५) कोलते वि.भी.-महाराष्ट्रातील कांही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र साहित्य मंडळ, १९८७, पृ.७७

६) देशमुख बी. - आयकॉनॉग्राफी ऑफ द हिन्दु टेम्पल्स इन मराठवाडा, पब्लीकेशन स्कीम, जयपूर १९८७ पृ. ५४

७) श्रीनिवास रित्तीं व ग.छा.शेळके, Inscription from Nanded District (Ned १९६८)

८) Epigraphia Indica Vol XXXV, Part IV, Oct. - १९६३, (Delhi)

९) देगलूर महाविद्यालय अभिव्यक्ती, अंक दुसरा/वर्ष दुसरे - संपादक, प्रकाश जोशी, पृ. ३८-४६

१०) प्राचीन भारत का इतिहास - व्ही.डी.महाजन - पृ. ७१२

११) भारतीय इतिहास - डॉ.ए.के.मित्तल

१२) इतिहास - बी.डी.शिंदे - पृ. २४८

१३) प्रत्यक्ष गावांना दिलेल्या भेटीचा अहवाल (स्वतः)


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded